# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर

THANE POLICE COMMISSIONERATE

## P.R.O. OFFICE, DCP ZONE-1, THANE CITY

Address- Office of Dy.Commissioner of Police, Zone-1, Thane,
Jail Road Thane, Near Old R.T.O.Office, Opp. Central Ground, Thane (w) Maharashtra 400601
Email Id- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No: +919819028279


**दिनांक :- ३०/०३/२०२४**

## १ कोटी ५ लाख किंमतीचे सोन्याचे दागिने घेवुन पसार झालेल्या चोरास नौपाडा पोलीसांनी केली अटक

दिनांक २५/०३/२०२४ रोजी फियादी नामे सुरेश पारसमल जैन, वय . ५९ वर्षे, धंदा व्यापार, रा. राजवंत बिल्डींग, लेक व्हयु २, डॉ.मुस रोड,दुसरा मजला, ठाणे यांनी फिर्याद दिली की, नोव्हेंबर २०२३ ते दिनांक ०९/०३/२०२४ या कालावधीत फिर्यादी यांचे सोन्याचे दुकानामध्ये मध्ये सेल्समन म्हणुन काम करणारा इसम नामे राहुल जयंतीलाल मेहता,रा.बी ७०१, अशोका हाईटस,गावदेवी मैदानाजवळ,ठाणे याने आमचा विश्वासघात करुन त्याचे ताब्यात विश्वासाने विक्रीकरीता दिलेले दागिन्यांपैकी ३८ छोटे व मोठे सोन्याचे हार , सोन्याचे २४ जोडी कर्णफुले, ०३ सोन्याच्या चैन,०५ सोन्याचे बाजुबंद बाजुबंद एकुण ७० दागिने त्याचे वजन १५९९.४७० ग्रॅम व त्याची एकुण किंमत १,०५,५५,७६६/- असे असलेले सोन्याच्या दागिन्यांचा अपहार करुन हेतुपरस्सर अपहार केला आहे. वरील प्रमाणे फिर्याद दिल्याने नौपाडा पोलीस स्टेशन गु.र.नं. ४५१/२०२४ भा.द.वि.कलम ४०८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास सपोनि मंगेश भांगे हे करीत असुन अप्पर पोलीस आयुक्त श्री विनायक देशमुख,मा.पोलीस उप आयुक्त श्री.सुभाष बुरसे, मा.सहा.पोलीस आयुक्त श्रीमती प्रिया ढाकणे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अभय महाजन,पोनि (गुन्हे) कुंभार यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे तपासी अधिकारी यांनी तपास चालु केला असता सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे राहुल मेहता याचा त्याचे राहते घरी तसेच कामाचे ठिकाणी व नातेवाईकांडे शोध घेतला असता सदर आरोपी हा दिनांक ०८/०३/२०२४ पासुन कामावर येत नसल्याचे निष्पन्न झाले तसेच दिनांक १५/०३/२०२४ रोजी आरोपीची पत्नी हिने त्याचे हरिवले बाबतची नौपाडा पोलीस स्टेशन मानव मिसिंग रजि.नं. १३ /२०२४ अन्वये तक्रार नोंद केली होती. यावरुन निषन्न झाले की, राहुल मेहता याने चोरी करुन ती चोरी उघड होईल या भितीने तो मोबाईल फोन बंद करुन निघुन गेलेला आहे.

सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी याचे तांत्रिक विष्लेषन करुन आरोपीची माहीती घेतली असता आरोपी हा फरार असतानाचे काळात तो मिरा रोड, मुंबई, इंदौर, गुजरात अशा वेगवेगळया ठिकाणी फिरत होता व पोलीसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न करीत होता. आरोपीच्या नातेवाईक, पत्नी व मित्र यांचे हालचालींवर लक्ष ठेवुन आरोपीचा शोध घेत असताना दिनांक २६/०३/२०२४ रोजी आरोपी हा त्याची मैत्रीणीस मिरा रोड येथे भेटण्यासाठी येणार असल्याची पोलीसांना माहीती मिळाली त्यावरुन पोलीसांनी मिरा रोड परिसरात सापळा रचुन आरोपी नामे राहुल जयंतीलाल मेहता यास शिताफीने

ताब्यात घेवुन त्यास सदर गुन्हयाकामी अटक केली आहे. आरोपीस मा.न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने त्याची दिनांक ३०/०३/२०२४ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर केलेली आहे.

आरोपीस ताब्यात घेतल्यानंतर त्याने सदर गुन्हा केल्याचे कबुल करुन त्यास दारु पिणे व मौजमजा करण्यासाठी पैसे कमी पडत असल्याने त्याने राजवंत ज्वेलर्स या ठिकाणी कामावर असताना गरज असेल तेंव्हा दुकानातुन सोन्याचे दागिने चोरुन ते त्याचे ओळखीचे ज्वेलर्स यांना विक्री करुन त्यामधुन आलेल्या पैश्यातुन तो मौजमजा करायचा. प्रथम चोरी केलेले दागिने हे मालकाच्या लक्षात न आल्याने आरोपीने मोठया प्रमाणात सोने चोरी करुन परराज्यात जावुन स्थायिक होण्याचा त्याचा मनसुबा होता.

अटक आरोपीकडुन तपासा दरम्यान चोरीस गेलेल्या सोन्याचे **दागिन्यापैकी २६ नेकलेस/हार, २१ कानातील कर्णफुले व ०३ गळयातील चैन असे सुमारे ६२,१०,०००/- रुपये किंमतीचे ९०० ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त** करण्यात आले आहे. उर्वरित दागिन्यांबाबत आरोपीकडे तपास चालु आहे.

सदर कामगिरी हि मा.पोलीस आयुक्त श्री.आशुतोष डुंबरे, मा.सह पोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण,मा.अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रा.विभाग श्री. विनायक देशमुख,मा. श्री.सुभाष बुरसे पोलीस उप आयुक्त,परि.१, मा.सहा.पोलीस आयुक्त श्रीमती प्रिया ढाकणे नौपाडा विभाग,वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अभय महाजन, पोनि(गुन्हे) श्री.शरद कुंभार यांचे मार्गदर्शनाखाली तपासी अधिकारी मंगेश भांगे,सहायक पोलीस निरीक्षक, पोउनि संगम पाटील,पोउनि दत्तात्रय लोंढे, पोहवा/२८५ गायकवाड,पोहवा/१२१९ पाटील, पोहवा/४६९६ देसाई, पोहवा/५६ रांजणे, पोहवा/६३३४ गोलवड, पोहवा/६४६५ तडवी, पोहवा/३१४६ विरकर, पोना/७२६१ माळी, पोशि/७६९५ कांगणे,पोशि/२५५६ तिर्थकर,यांनी केलेली आहे.

-----------------------------